# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील ग्रामीण भागात आरोग्य विभागामार्फत नियुक्त केलेल्या आशा कर्मचाऱ्यांना मानधन, बैठक भत्यात वाढ करण्याबाबत**

**(१) ४६४२३ (११-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात आरोग्य विषयक अडचणी दुर करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत नियुक्त केलेल्या आशा कर्मचाऱ्यांना मागील ०६ वर्षापासुन मानधन, बैठक भत्यात वाढ करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती आशा कर्मचाऱ्यांचे मानधन वाढविण्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०६-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

आशा स्वयंसेविकेस मानधन अदा करण्यात येत नसून कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येतो.

आशा स्वयंसेविकांची मासिक बैठक दरमहा प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर होत असून सदर बैठकीस उपस्थित राहील्यास केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार आशा स्वयंसेविकेस रु.१५०/- इतका मासिक बैठक भत्ता अदा करण्यात येतो.सदर बैठक भत्त्यामध्ये रु.२००/- एवढी वाढ करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्तावित करण्यात आलेले होते,मात्र त्यास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीसंदर्भात**

**(२) ५०७७१ (११-०५-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग आणि जिल्हा रुग्णालयातर्फे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण अभियान "एनआरएचएम" अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी सन २०१४-१५ साठी ३४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तथापि सन २०१४-१५ च्या आर्थिक वर्षात सदर निधीपैकी फक्त ३० कोटी रुपयांचा खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढा कमी निधी खर्च होण्याची कारणे काय आहेत व उर्वरित निधी खर्च होण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०६-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. सन २०१४-१५ मध्ये जळगाव जिल्हयासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एकूण रू. ३१.६५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी रू. २८.६१ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे.

(३) खर्च कमी होण्याची कारणे :-

अ) केंद्र शासनाकडून सन २०१४-१५ चा कृती आराखडा दिनांक १५ नोव्हेंबर,२०१४ रोजी मंजूर झाला.त्यानूसार केंद्र शासनाकडून मार्च,२०१५ अखेर निधी प्राप्त झाला होता.वर्षअखेर प्राप्त झालेला निधी राज्यस्तरावरून तातडीने सर्व जिल्हयांना वितरीत करण्यात आला.

ब) उर्वरित निधी खर्च होण्यासाठी केलेल्या उपाययोजना -

१) बांधकामाबाबत तात्काळ निविदा प्रक्रीया करून ठेकेदारांवर पर्यवेक्षण करून कामे पूर्ण करण्यात आली.

२) नियमित योजनांविषयी (जननी सुरक्षा योजना, कुटुंब कल्याण कार्यक्रम, नियमीत लसीकरण ई.) विशेष आढावा सभा घेऊन भौतिक आर्थिक बाबींमध्ये सुधारणा करण्यात आली.

३) आशांचे प्रशिक्षण नियोजनबध्द कार्यक्रम करून १०० % पूर्ण करण्यात आले. तसेच आशा योजनांचा विविध कामाविषयक मोबदला त्वरीत अदा करण्यात आला.

(४) रिक्त असलेली पदे भरून मानधनावरील खर्च वेळेवर करण्यात आला.

(५) रूग्ण कल्याण समिती, वार्षिक देखभाल दुरूस्ती व अबंधित निधी विषयी नियमीत नियामक व कार्यकीरी समितीच्या बैठका घेऊन खर्च वाढविण्यावर भर देण्यात आला.

---

**बीड जिल्हा रुग्णालयातील लॅमिनार शस्त्रक्रिया गृहासाठी निधी मंजूर करणेबाबत**

**(३) ५२६७६ (११-०५-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा रुग्णालयातील लॅमिनार शस्त्रक्रिया गृहासाठी शस्त्रक्रियासाठीची प्रक्रिया अधिक सुलभ व अत्याधुनिक लॅमिनार पध्दतीने करण्यासाठी जिल्हा रुगणालयाने ८४ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळी स्थितीमुळे जिल्हावासीय आर्थिक टंचाईत असल्याने खासगी रुग्णालयाऐवजी जिल्हा रुग्णालयात उपचार घेतात, तीनशे खाटांची क्षमता असलेल्या रुग्णालयात रोज ६०० ते ८०० रुग्ण भरती होतात व रोज ३५ च्या आसपास शस्त्रक्रिया होतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत निधी मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) नाविण्यपुर्ण योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रु.८४ लक्ष निधी मधून सदर लॅमिनार शस्त्रक्रिया गृहाचे काम पुर्ण करण्यात आले असुन ते माहे फेब्रुवारी, २०१७ पासुन कार्यान्वित झाले आहे.

---

**राज्यांमध्ये ईमर्जन्सी मेडिकल टेक्निशिअनना १०८ ॲम्ब्युलन्स वर काम करण्यास परवानगी देण्याबाबत**

**(४) ५३४८७ (११-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात फक्त B.A.M.S., D.H.M.S. व युनानी डॉक्टरांना (१०८) ॲम्ब्युलन्स सेवा वर काम करण्यास परवानगी असून राज्यातील ईमजन्सी मेडीकल टेक्नीशियन (EMT) च्या कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांना परवानगी नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर राज्यांमध्ये ईमर्जन्सी मेडिकल टेक्निशिअनच्या विद्यार्थ्यांना १०८ ॲम्ब्युलन्स वर काम करण्यास परवानगी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सुरु असलेली १०८ ॲम्ब्युलन्स सेवेवर ईएमटी कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांना काम करण्याची परवानगी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
अन्य काही राज्यामध्ये डॉक्टरांच्या ऐवजी Emergency Medical Technician अर्हता धारकांना नियुक्त केले जाते.

(३) महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत टोल फ्री क्रमांकावरील १०८ रुग्णवाहिकांवर आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी शासनाच्या धोरणाप्रमाणे योग्य ती अर्हता असणा-या डॉक्टरांची नेमणूक करण्यात येत असून सदर डॉक्टरांऐवजी EMT अर्हता धारकांना नेमणूक देता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) येथील ट्रामा केअर सेंटर तातडीने कार्यान्वित करण्याबाबत**

**(५) ६६१८७ (१०-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) येथील ट्रामा केअर सेंटर बांधून तयार झाले असतानाही आजमितीपर्यंत कार्यान्वित करण्यात आले नाही, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू ट्रामा केअर सेंटर तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) आष्टी (जि.बीड) येथील ग्रामीण रुग्णालयाशी संलग्न असलेले ट्रामा केअर सेंटरसाठी आवश्यक पदनिर्मितीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रूग्णवाहिकाअभावी उपचार न मिळल्याने एका मुलीचा झालेला मृत्यू**

**(६) ६९८८१ (१०-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रात रूग्णवहिका नसल्यामुळै एका बालिकेचा उपचाराअभावी दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०६-२०१८) :** (१) दिनांक २९.०९.२०१६ रोजी सदर बालिकेस प्रथम कुडूस येथील एका खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. खाजगी रूग्णालयात ऑक्सिजन नसल्यामुळे तेथील डॉक्टरांनी तिला अत्यंत गंभीर परिस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र, कुडूस येथे पाठविले. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्रात बालिकेची प्रकृती अतिगंभिर झाल्याने संदर्भसेवेसाठी तिला ग्रामीण रूग्णालय वाडा येथे नेणे आवश्यक होते. प्रा.आ. केंद्रातील रूग्णवाहिका औषधे आणण्यासाठी प्रा.आ.केंद्र सोमाटा येथे पाठविण्यात आली होती. तर १०८ क्रमांकाच्या रूग्णवाहीकेचे टायर फुटल्याने ती नादुरूस्त होती. तसेच प्रा.आ. केंद्र वज्रेश्वरी येथील १०८ क्रमांकाची रूग्णवाहिका पोहचण्यास ३५-४० मिनिटांचा कालावधी लागणार होता. त्यामुळे खाजगी वाहनाने ऑक्सिजन लावून सदर बालिकेस ग्रामीण रूग्णालय, वाडा येथे नेण्याची कार्यवाही अवघ्या १० मिनिटात करण्यात आली. परंतु सदर प्रवासादरम्यान तिचा मृत्यू झाला. त्यामुळे रूग्णवाहिका नसली तरी वाहनांची पर्यायी व्यवस्था केली होती. तसेच उपचारामध्ये तिला ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात आला होता. त्यामुळे सदर बालिकेचा मृत्यू रूग्णवाहिका अथवा उपचाराअभावी झाला अशी वस्तुस्थिती नाही.

(२) व (३) सदर मृत्यू प्रकरणी मृत बालिकेच्या वडीलांनी त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचा लेखी जबाब दिला आहे. या प्रकरणी तालुका आरोग्य अधिकारी, वाडा यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, कुडुस येथील १०८ क्रमांकाची रूग्णवाहिका टायर फुटल्याने नादुरूस्त असल्याची बाब वरिष्ठ कार्यालयाच्या निदर्शनास न आणल्याबध्दल वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र, कुडूस यांना दि. ८.१०.२०१६ कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. १०८ क्रमांकाच्या रूग्णवाहिकेचे टायर दुरूस्त करण्यात आले आहे व सद्य:स्थितात १०८ क्रमांकाची रूग्णवाहिका कार्यान्वित आहे.

---

**राज्यातील सिकलसेल रुग्णांसाठी सिकलसेल नियंत्रण सोसायटी स्थापन करण्याबाबत**

**(७) ७२१६० (१०-०१-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सिकलसेल रुग्णांसाठी सिकलसेल नियंत्रण सोसायटी स्थापन करण्यासंबंधी मा.राज्यपालांनी निर्देश देऊनही अद्याप या गंभीर व दुर्धर आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी निर्णय घेतला गेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सिकलसेल ग्रस्त असणाऱ्या दीड लाख रुग्णांवर उपचारासाठी सिकलसेल नियंत्रण सोसायटी स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली सिकलसेल आजार नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.सदर कक्षामध्ये या कार्यक्रमाच्या देखरेखीखाली सहसंचालक (तांत्रिक), गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रम सहाय्यक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठामधील रिक्त पदांबाबत**

**(८) ७५३७८ (१८-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कुलसचिव क्रिडा संचालक, वित्त व लेखा अधिकारी, कक्ष अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, सांख्यिक सहाय्यकापासून छायाचित्राकारापर्यंत ८३ अत्यावश्यक पदे भरण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने ९ जून २०१६ रोजी मान्यता देऊनही विद्यापीठाने अद्यापी पदे भरण्यासाठी जाहिरातही दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) वैद्यकीय शिक्षण विभागाने या पदांच्या वेतनासाठी १० कोटी रूपयांची वार्षिक तरतूदही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कुलसचिव, क्रीडा संचालक तसेच वित्त व लेखा अधिकारी ही पदे भरली आहेत.

दिनांक ९ जून, २०१६ रोजी मंजूर करण्यात आलेली पदे अद्याप भरलेली नाहीत.

(२) विद्यापीठातील शासन मंजूर पदांसाठी १०० टक्के वेतन अनुदान देण्यात येते.

(३) विद्यापीठातील शासन मंजूर पदांकरिता प्रस्तावित सेवाप्रवेश परिनियम मा.कुलपती यांच्या अनुमतीसाठी सादर करण्यात आले आहेत. मा.कुलपती यांच्या संमतीनंतरच सेवाप्रवेश नियम लागू करता येतील व उक्त सेवाप्रवेश नियमानुसार रिक्त पदांच्या भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रा.आ.केंद्र कानेगाव (ता.लोहारा) येथील उपकेंद्र मौजे खेड (ता.लोहारा) येथे स्थलांतरित करण्याबाबत**

**(९) ८२५४५ (१८-०४-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रा.आ.केंद्र कानेगाव (ता.लोहारा) येथील उपकेंद्र मौजे खेड, (ता.लोहारा) येथे स्थलांतरित करण्यास परवानगी देण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांची कामे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे तसेच ते स्थलांतरण निकषात बसत नाही, यामुळे उपकेंद्राच्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यास उपकेंद्राचे स्थलांतर करणे आवश्यक नसल्याचे आरोग्य सेवा संचालनालयाच्या दि.३.०७.२०१५ व दि.२३.०२.२०१६ च्या पत्रान्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती व भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील गावामध्ये जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत कामे मंजूर करण्याबाबत**

**(१०) ८२७१५ (१५-०४-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती व भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील गावामध्ये जलयुक्त शिवारअभियानअंतर्गत कामे मंजूर करण्यासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांना संबंधित लोकप्रतिनिधी यांनी कामे प्रस्तावित केली असून परंतु सदरची कामे अद्यापपर्यंत मंजूर झालेली नसून विशेषतः चिखलदरा येथील आदीवासी बहुल गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून कायमची उपाय योजना होण्यासाठी ब्रहसती तलाव मंजूर करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्र पाठवून विनंती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये अमरावती व भातकुली तालुक्यात अनुक्रमे १०२ व २३ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. अमरावती व भातकुली तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे पूर्ण झाली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

चिखलदरा येथील आदिवासी बहुल भागात बारमाही पाणीपुरवठा करण्यासाठी ब्रम्हासती या लहान नदीवर धरण बांधकाम करणेबाबत निवेदन तत्कालिन लोकप्रतिनिधींनी दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने सहायक अधीक्षक अभियंता, अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, अमरावती यांनी प्रकल्प स्थळी १.८७ दलघमी पाणी उपलब्ध होत आहे तथापि, प्रस्तावित प्रकल्पास लाभ क्षेत्र उपलब्ध होत नसल्याने पाटबंधारे प्रकल्प पूर्ण होवू शकत नसल्याचे नमूद केले आहे. सदर प्रकल्पस्थळी निव्वळ पाणी पुरवठा योजना राबविण्याकरिता धरण बांधावयाचे झाल्यास पाटबंधारे विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत प्रशासक सिडको, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील साळवे नर्सिंग महाविद्यालयाचे संस्थापक विद्यार्थीनींशी गैरवर्तणूक करीत असल्याबाबत**

**(११) ८४१९५ (१९-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील साळवे नर्सिंग महाविद्यालयाचे संस्थापक विद्यार्थीनींशी गैरवर्तणूक करीत असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची मागणी बी.एस्सी नर्सींग प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनींनी जिल्हाधिकारी, गडचिरोली व संबंधीत पोलिस अधिकाऱ्यांकडे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बी.एस्सी नर्सिंग द्वितीय वर्षाचा निकाल लागून १२ विद्यार्थीनींपैकी ६ विद्यार्थीनींना शून्य गुण देऊन अनुत्तीर्ण करण्यात आले तर ६ विद्यार्थीनींचा निकाल राखून ठेवण्यात आला तर वसतीगृहात देण्यात येणारे अन्न निकृष्ट दर्जाचे असून इतर सोयी सुविधा नसल्यामुळे अन्य कॉलेजमध्ये प्रवेश देण्यात यावा तसेच संस्था चालकांविरुध्द कारवाई करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

डॉ. साळवे कॉलेज हे महाविद्यालय हिवाळी २०१६ या परिक्षेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे मुल्यांकन केंद्र नव्हते. त्यामुळे, संबंधीत विद्यार्थ्यांना शुन्य गुण देऊन अनुत्तीर्ण करण्यात आलेले नाही.

(३) होय.

(४) साळवे नर्सिंग महाविद्यालयाचे संस्थापक डॉ.प्रमोद वासुदेव साळवे यांचे विरोधात ५ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कुटीर रुग्णालयातील जनरेटर बंद असल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१२) ८५११५ (२१-०८-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कुटीर रुग्णालयातील जनरेटर बंद असल्यामुळे तेथील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे रुग्णालयातील रुग्णांना सेवा देत असताना कर्मचारी व डॉक्टरांना मेणबत्तीच्या मंद उजेडात काम करावे लागत असून प्रसूती विभागातही गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील एकमेव अशा रुग्णालयात अपुरे तज्ञ डॉक्टर, नर्स, कर्मचारी वर्ग, त्यातच औषधपुरवठाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंधुदुर्ग येथील ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांना शासकीय रुग्णालयात अद्यावत सेवा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग येथील १५ वर्षापूर्वीचा जुना व नादुरुस्त असलेला जनरेटर बदलून दि.७.०१.२०१७ रोजी ५० के.व्ही. क्षमतेचा नविन जनरेटर सेट कार्यान्वित करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशतः खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालयासाठी १०० खाटांच्या निकषाप्रमाणे ९४ पदे व १ नेत्र चिकित्सा अधिकारी अशी एकूण ९५ पदे मंजूर असून त्यापैकी ६८ पदे भरलेली असून २७ पदे रिक्त आहेत. नियमित पध्दतीने सदर रुग्णालयात १ स्त्रीरोगतज्ञ, १ बालरोगतज्ञ व १ फिजिशियन उपलब्ध आहेत. आयपीएचएस योजनेतून कंत्राटी पध्दतीने २ नेफ्रोलॉजिस्ट, १ अस्थिरोगतज्ञ, २ भूलतज्ञ कार्यरत आहेत. औषधांचा साठा मुबलक प्रमाणात आहे.
(४) उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी येथे उपरोक्त आरोग्य सेवा बरोबरच डायलेसिस युनिट सुरु करण्यात आलेले आहे. तसेच रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राधानगरी (जि. कोल्हापूर) तालुक्यातील धामणी येथील दुर्गम व डोंगराळ भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(१३) ८७०२४ (१२-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील धामणी येथील दुर्गम व डोंगराळ भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना खाजगी बोगस डॉक्टरांवरच अवलंबून रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळयात या खोऱ्यात अतिपावसामुळे दळणवळण व्यवस्था कोलमडते त्यामुळे गंभीर रुग्णांना तसेच गरोदर महिलांना अनेकदा प्राण गमवावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच सामाजिक संस्थांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धामणी येथील दुर्गम व डोंगराळ भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा उपलब्ध देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत ०४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राधानगरी तालुक्यातील धामणी येथील दुर्गम व डोंगराळ भागातील रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र धामोड आणि पडसाळी व चौके मानबेट येथील उपकेंद्रामार्फत सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.
(२) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र धामोड येथील बराचसा भाग हा अतिदुर्गम असल्याने दळणवळण व संपर्काच्या साधनांचा अभाव आहे. त्यामुळे पावसाळ्यात काही वेळा रुग्णवाहिका वेळेत पोहचत नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३), (४) व (५) धामणी येथील गंभीर रुग्णांना व गरोदर महिलांना संदर्भ सेवेसाठी आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका व १०८ रुग्णवाहिका सेवा (३२ किमी अंतरावर असलेल्या) राशिवडे प्राथमिक आरोग्य केंद्राकडे उपलब्ध केलेली आहे. गेल्या ५ वर्षामध्ये कोणत्याही गरोदर महिलेला दळणवळण व्यवस्था कोलमडल्यामुळे प्राण गमवावा लागलेला नाही. धामणी येथील रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता म्हासुर्ली येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केलेले आहे. सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीकरीता गायरान मधील ६७ गुंठे जागा उपलब्ध झाली असून पुढील कार्यवाही जिल्हा परिषद कोल्हापूर स्तरावर सुरु आहे.

---

### राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्रलंबित लघू पाटबंधारे प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ८७३५७ (१९-०८-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील प्रलंबित लघू पाटबंधारे प्रकल्पांना निधी उपलब्ध करणेकरीता मा.जलसंधारण मंत्री यांचेकडे २ हून अधिक बैठका घेऊन ही सदर प्रकल्पांना निधीची उपलब्धता झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पडखंबे व झापाचीवाडी (ता.भुदरगड) या प्रकल्पांना शासन तात्काळ निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०७-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे. लघु पाटबंधारे तलाव झापाचीवाडी, ता.भूदरगड, जिल्हा कोल्हापूर या योजनेच्या कामासाठी माहे मार्च, २०१८ पर्यंत रु.५३१.७७ लक्ष खर्च झालेला असून, एप्रिल, २०१८ मध्ये रु.९७.८० लक्ष असे एकूण रु.६२९.५८ खर्च झालेला आहे. योजनेच्या भूसंपादन प्रकरणी अद्याप निवाडा जाहीर झालेला नाही. लघु पाटबंधारे तलाव पडखंबे, ता.भूदरगड, जिल्हा कोल्हापूर या योजनेची प्रशासकीय मान्यता पुनर्जिवित करण्यात आलेली असून, योजनेच्या धरणाच्या कामाच्या रु.१२.२६ कोटी रुपये किंमतीच्या निविदेस मंजूरी देण्यात आलेली आहे. क्षेत्रीय स्तरावरुन मागणी व निधीच्या उपलब्धतेनुसार निधीचे नियोजन करण्यात येईल.

(२) लघु पाटबंधारे तलाव झापाचीवाडी, ता.भूदरगड, जिल्हा कोल्हापूर या योजनेच्या कामासाठी माहे मार्च २०१८ पर्यंत रु.५३१.७७ लक्ष खर्च झालेला असून, एप्रिल २०१८ मध्ये रु.९७.८० लक्ष असे एकूण रु.६२९.५८ खर्च झालेला आहे. योजनेच्या भूसंपादन प्रकरणी अद्याप निवाडा जाहीर झालेला नाही. लघु पाटबंधारे तलाव पडखंबे, ता.भूदरगड, जिल्हा कोल्हापूर या योजनेची प्रशासकीय मान्यता पुनर्जिवित करण्यात आलेली असून, योजनेच्या धरणाच्या कामाच्या रु.१२.२६ कोटी किंमतीच्या निवदेस मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हा स्त्री रुग्णालयातील खाटांची क्षमता वाढविण्याबाबत**

**(१५) ८७५४२ (१९-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा स्त्री रुग्णालयात जवळजवळ १५० ते २०० स्त्री रुग्ण येत आहेत परंतु सद्यस्थितीत रुग्णालयात केवळ ६० खाटांची संख्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात कमी खाटांची संख्या असल्याने बऱ्याच वेळा स्त्री रुग्णास जमिनीवरच औषधोपचार घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयातील खाटांची संख्या वाढविण्यासाठी व तेथील आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्री उपलब्धतेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

स्त्री रुग्णांची संख्या वाढल्यास व पुरेशा खाटा उपलब्ध नसल्यास स्वतंत्र गादीची व्यवस्था करुन उपचार दिले जातात.

(३) हे खरे आहे.

(४) सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे सुधारित जोड बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरु असून, सदर रुग्णालयाच्या मागणीचा बृहत आराखडयामध्ये निकषानुसार समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा उपवनसंरक्षक कार्यालयातील गैरकारभाराबाबत**

**(१६) ८८६२० (१६-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा उपवनसंरक्षक कार्यालयातील गैरकारभाराबद्दल आणि कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत पांढरकवडा येथील समाजसेवकांनी मा.मुख्यमंत्री, वने मंत्री, अमरावती विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य वन संरक्षक, यवतमाळ यांच्याकडे पुराव्यानिशी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने याबाबत सखोल चौकशी करून संबंधीतांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,
(३) असल्यास, या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे काय
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा उपवनसंरक्षक कार्यालयाच्या गैरकारभाराबद्दल आणि कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत अध्यक्ष, जनसेवक सेवा समिती, पांढरकवडा यांच्याकडून मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १.४.२०१७ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) मौजा सुन्ना बिटातील झालेल्या उपरोक्त कामाची विभागीय वन अधिकारी, यवतमाळ यांच्या मार्फत पहाणी/चौकशी केली असता अंदाजपत्रकानुसार कामे करण्यात आली असून यामध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे संबंधीतांवर गुन्हे दाखल करण्याचा किंवा अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिराळा (जि. सांगली) तालुक्यातील डोंगरी, बिळाशी, येळापूर व पाचगणी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेबाबत**

**(१७) ८८७५५ (१२-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील डोंगरी, बिळाशी, येळापूर व पाचगणी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रास शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी आरोग्य केंद्र काढण्याकरिता जागा उपलब्ध होऊनही अद्यापी सदर केंद्राचे बांधकाम करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य केंद्राच्या उभारणीकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१४१/ आरोग्य-३, दि.१७ जानेवारी, २०१३ अन्वये शिराळा तालुक्यातील डोंगरी, बिळाशी, येळापूर व पाचगणी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर केलेली आहेत.
(२) हे खरे नाही.
सदर ठिकाणी अद्यापी जागा उपलब्ध झालेल्या नाहीत.
(३) प्राथमिक आरोग्य केंद्रास जागा उपलब्ध होण्यासाठी जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकरुड (ता.शिराळा, जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अन्य ठिकाणी स्थलांतर करण्याबाबत**

**(१८) ८८७७६ (१९-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकरुड (ता.शिराळा, जि. सांगली) येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर झाले असल्याने सदर ठिकाणचे प्राथमिक आरोग्य केंद्र अन्य ठिकाणी स्थलांतर करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, शिराळा तालुक्यात टाकवे हे ठिकाण मध्यवर्ती असल्याने व तेथे प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता शासनाची जागा उपलब्ध असल्याने कोकरुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र टाकवे येथे स्थलांतरित करावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कोकरुड येथील ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम प्रगतीपथावर असून याठिकाणी ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित झाल्यावर तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र नजिकच्या गावांमध्ये लोकसंख्येच्या निकषानुसार व जागेच्या उपलब्धतेनुसार स्थलांतरीत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साकुर्ली चिखली डोहाने (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील वक्रांगी प्रा.ली. कंपनीने वनविभागाच्या जागेमध्ये अतिक्रमण केल्याबाबत**

**(१९) ८९२६४ (११-०८-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकुर्ली चिखली डोहाने (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील वक्रांगी प्रा.ली.कंपनीने वनविभागाच्या जागेमध्ये अतिक्रमण करून जागा काबीज करण्याचा प्रयत्न केला असून त्यास वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा वरदहस्त असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार वक्रांगी कंपनीचे अतिक्रमण निष्काषित करून वन विभागाच्या वरिष्ठ व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. साकुर्ली सजेतील श्री.अशोक गौतम व मनोज महेंद्र नंदवाना (संपूर्ण कुटुंबीय) यांनी त्यांचे जागेमध्ये केलेल्या अनाधिकृत जंगलतोड व दगड माती उत्खनन केलेबाबत दिनांक ३०.५.२०१६ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला होता. त्यास अनुसरून सहाय्यक वनसंरक्षक, शहापूर यांनी दिनांक १.६.२०१६ रोजी सर्व्हे क्र. ३६७ चे क्षेत्राची वनपाल साकुर्ली यांच्यासोबत तपासणी केली असता सदर क्षेत्रात अपरिपक्व (लहान झाडे झुडपे) अैन ६७ व इंजायली ९८ अशी एकूण १६५ झुडपे तोडलेली दिसून आली असता सदर क्षेत्राचे जमीन मालक श्री.राजेंद्र ब्रिजमोहन बोहरा, श्री.मनोज महेंद्र नंदवाना व श्री.निखील महेंद्रकुमार नंदवाना रा.मुंबई यांच्या नावे विनापरवाना तोडण्यात आलेल्या झुडपांबाबत वन परिमंडळ साकुर्ली यांच्याकडे दिनांक १.६.२०१६ अन्वये वनगुन्हा नोंदविलेला आहे. तसेच वन क्षेत्रपाल डोळखांब यांनी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ सुधारणा १९८९ अंतर्गत चौकशी करुन संबंधित आरोपी यांच्याकडून रक्कम रु. ७२००/- इतका दंड वसूल केला आहे.

मौजे साकुर्ली येथील सर्व्हे क्रमांक २२८/१, २२८/३ पैकीचे क्षेत्राची वनक्षेत्रपाल डोळखांब यांनी अधिनस्त कर्मचाऱ्यांसमवेत दिनांक ९.६.२०१६ रोजी तपासणी/चौकशी केली असता अंदाजे १.०० क्षेत्रावरील झुडपे व खुंट मजूरांकरवी साफ केल्याचे दिसून आले व सदर क्षेत्रात अपरिपक्व (लहान झाडे झुडपे) अैन १०३ व इंजायली ९४ असे एकूण १९७ झुडपे तोडलेली दिसून आली. प्रकरणी विनापरवाना तोडण्यात आलेल्या झुडपांबाबत वन परिमंडळ साकुर्ली यांनी दिनांक ९.६.२०१६ अन्वये सदर क्षेत्राचे मालक यांचेविरुद्ध वनगुन्हा नोंदविलेला आहे. प्रकरणी वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल डोळखांब यांनी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ सुधारणा १९८९ अंतर्गत चौकशी करुन संबंधित आरोपी यांचेकडून रक्कम रुपये ११६००/- इतका दंड वसूल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घनसावंगी व अंबड (जि.जालना) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मंजूर झालेली कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२०) ८९९४९ (१९-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील घनसावंगी व अंबड तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेतील तयार केलेल्या कृती आराखडयाप्रमाणे फक्त ५ ते १० टक्केच कामे झालेली असून निवड झालेल्या काही गावात अद्यापही कामाला सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झालेली ५ ते १० टक्के कामे निकृष्ट दर्जाची आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील योजनेअंतर्गत निवडलेल्या काही गावातील उर्वरीत कामे पूर्ण करण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, या योजनेतील कृती आराखडयातील १००% कामे पूर्ण करण्यासाठी व निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) सन २०१६-१७ मधील अपूर्ण कामे माहे जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माझी कन्या भाग्यश्री योजनेतील त्रुटीबाबत**

**(२१) ९०१९२ (१६-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ''माझी कन्या भाग्यश्री'' या योजनेला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरही गेल्या वर्षभरात जन्म झालेल्या एकाही कन्येच्या पालकांच्या बँकेच्या खात्यावर पाच हजार रुपये जमा झाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या योजनेचा लाभ मिळावा याकरिता राज्यातून आलेल्या २०० अर्जांना अनाकलनीय नियम व अटी लावण्यात येऊन अपात्र ठरविण्यात आले आहेत, हे ही खरे आहेत काय,

(३) असल्यास, या योजनेत कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत व त्या त्रुटी दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३-०७-२०१८) :** (१), (२) व (३) माझी कन्या भाग्यश्री ही योजना प्रथम दिनांक ०१ एप्रिल, २०१६ रोजी २ मुलींच्या जन्माच्या स्वागतासाठी विविध लाभ देण्यासाठी लागू करण्यात आली होती. त्यानंतर शासन निर्णयातील तरतूदीबाबत क्षेत्रिय कार्यालयांना

मार्गदर्शन होण्यासाठी स्पष्टीकरणात्मक सूचना दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आल्या होत्या. एक वर्षाचा कालावधीत जनतेकडून योजनेस सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सुधारित माझी कन्या भाग्यश्री ही योजना दिनांक ०१ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. आता लागू केलेली योजना बँकेमार्फत लाभ मिळणार असल्यामुळे जनतेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यापूर्वी दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ जुलै, २०१७ या कालावधीत ज्या लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ मिळणेसाठी अर्ज केलेले आहेत व जे या योजनेसाठी पात्र आहेत अशा सर्व लाभार्थ्यांना नविन योजनेप्रमाणे लाभ देण्यात येणार आहे.

---

## खेड, दापोली व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कृषी खात्यांतर्गत झालेल्या कामांची चौकशी करण्याबाबत

**(२२) ९१५८२ (१५-०८-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, दापोली व मंडणगड (जि. रत्नागिरी) तालुक्यातील कृषी खात्यांतर्गत सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या दोन वर्षामध्ये झालेल्या कामांची वरिष्ठ पाताळीवर चौकशी करून संबधित लोकप्रतिनिधी, अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याबाबतचे लेखी निवेदन युवसेना कोर कमिटी सदस्य यांनी दिनांक २२ मे , २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.कृषी मंत्री ,मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांचे मार्फत समिती नेमण्यात येऊन प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार, तत्का.कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक यांच्याविरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ४ (१)(अ) मधील तरतूदीनुसार निलंबनाची कारवाई विभागीय कृषि सहसचांलक कोकण विभाग,ठाणे यांचेमार्फत करण्यात आली आहे. कृषि विभागाने संबंधित तालुका कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी यांना त्यांच्या दि. २/८/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणाची विभागीय दक्षता पथकामार्फत त्याचप्रमाणे, पोलिस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांचेमार्फतही चौकशी करण्यात येत आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रत्नागिरी यांनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी, जि. रत्नागिरी व जिल्हा उपनिबंधक रत्नागिरी यांना संबंधित ठेकेदार यांना काळया यादीत टाकणे किंवा इतर अनुषांगिक प्रशासकीय कारवाई करणेसाठी शिफारस केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यात नदी पुनरुज्जीवन अंतर्गत साखळी सिमेंट नालाबांध कामाना तातडीने मंजूरी देण्याबाबत**

**(२३) ९२०६४ (१८-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील भोनक, अनेर, गुळी या नद्यांना तसेच पालक नाला, गवळी व दूध मोगरा नाल्यावर नदी पुनरुज्जीवन अंतर्गत साखळी सिमेंट नालाबांध कामाना तातडीने मंजूरी देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लोकप्रतिनिधी यांचे पत्राच्या अनुषंगाने शासन पत्र दि.१२/७/२०१७ व दि.०७/०४/२०१८ नूसार जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कजगाव-कनाशी (ता.भडगांव, जि.जळगांव) रस्त्यांवरील नादुरुस्त बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत**

**(२४) ९२१७६ (१८-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कजगाव-कनाशी (ता.भडगांव, जि.जळगांव) रस्त्यावरील एका नादुरुस्त बंधा-यांवर तब्बल दोन वर्षापासून लाखो लीटर पाणी वाया जात असल्याची तक्रार तेथील शेतकऱ्यांनी वारंवार कृषि विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधा-याच्या दुरुस्तीबाबत वारंवार मागणी करुनही कृषि विभागाने दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बंधा-याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) संबंधित बांधासंदर्भात तालुका कृषी अधिकारी यांचेकडे लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, दि.१२/४/२०१८ रोजी उपविभागीय कृषी अधिकारी, पाचोरा, तालुका कृषी अधिकारी, भडगाव, तंत्र अधिकारी पाणलोट शाखा व इतर यांनी संयुक्तरीत्या स्थळ पाहणी केली. कजगाव कनाशी रस्त्यावर कृषी विभागामार्फत अंदाजे ३० ते ३५ वर्षापूर्वी माती नाला बांधाचे काम झाले आहे. सदर बांधाचे आर्युमान संपले आहे. सदर बांधालगतच्या सांडव्यात शेतकऱ्याने कृत्रिमरीत्या मातीचा भराव करून पाणी

अडविले त्यामुळे नैसर्गिक सांडवा बंद झाल्याने संपूर्ण बांधातील पाण्याचा दाब कृत्रिमरीत्या केलेल्या बांधावर येऊन ५ ते ७ वर्षापूर्वी सदर कृत्रीम बांध फुटला असून सांडव्याची धुप झाली आहे. तथापि, माती नाला बांधाच्या मुख्य भिंतीचे नुकसान झालेले नाही. नाला तळाची पातळी व सांडव्याची पातळी एकसमान झाल्यामुळे सांडव्यात सिमेंट बार टाकूनही अपेक्षित पाणीसाठा मिळणार नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील दुर्गम भागातील शेतकऱ्यांना "जलयुक्त शिवार अभियाना" चा लाभ मिळण्याबाबत

**(२५) ९३११५ (१९-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात मागील दोन वर्षात "जलयुक्त् शिवार अभियाना" मुळे जिल्हयातील ६ हजार हेक्टर शेती सिंचनाखाली आली असल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियानामुळे १० हजार टीसीएम पेक्षा जास्त जलसाठा वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील दुर्गम भागातील शेतकऱ्यांना सदर अभियानाचा लाभ मिळण्यासाठी कोणती खास मोहिम राबविण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रशिक्षण व शिवारफेरीद्वारे जलयुक्त शिवार अभियानाचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे.

---

## पाचाड (जि.रायगड) येथील रायगड जिल्हा परिषदेकडून बांधण्यात आलेल्या तलावाचे काम अयोग्य पध्दतीने झाल्याबाबत

**(२६) ९३२५८ (१९-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचाड (जि.रायगड) येथील राष्ट्रमाता जिजाऊच्या समाधीशेजारी असणा-या रायगड जिल्हा परिषदेकडून बांधण्यात आलेल्या तलावाचे काम योग्य पध्दतीने झाले नसल्याने सदर कामाची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून माहे जून,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार तलावाचे काम अयोग्य पध्दतीने करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर तलावाच्या तळभागात काही प्रमाणात तडे गेल्याने पाणीसाठा कमी प्रमाणात होत होता. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गळती काढण्याचे काम करण्यात आलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात "माझी कन्या भाग्यश्री" ही महत्वकांक्षी योजना शासनाने सुरु केली मात्र अटी-शर्ती व प्रचार-प्रसाराचा अभाव असल्याबाबत**

**(२७) ९५९६२ (२६-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलींचा जन्मदर वाढावा, बालविवाह रोखता यावा या उददेशाने राज्यात "माझी कन्या भाग्यश्री" ही महत्वकांक्षी योजना शासनाने सुरु केली मात्र अटी-शर्ती व प्रचार-प्रसाराचा अभाव असल्याने अनेक नागरीक या योजनेपासून वंचित असल्याची बाब माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आले, हे खरे आहे काय.
(२) असल्यास या योजनेसंदर्भात महिला व बालकल्याण विभागाला स्वारस्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास माझी कन्या भाग्यश्री योजना प्रचार-प्रसार करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येणार आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) माझी कन्या भाग्यश्री ही महत्वकांक्षी योजना शासनाने दिनांक ०१ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या सुधारित नवीन निकषांनुसार लागू केलेली आहे. या योजनेच्या प्रचार प्रसिध्दीसाठी सर्व जिल्हयांत शाळा-महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, ग्रामसभांमधून शासन निर्णयाचे वाचन करण्यात आले, जिल्हयांमध्ये वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसारीत करण्यांत आलेल्या आहेत.

---

**साक्री (जि. धुळे) तालुक्यात नाबार्डने पाणलोट क्षेत्र विकासासाठी निवड करण्यात आलेल्या प्रकल्पात स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करण्याबाबत**

**(२८) ९८३८४ (२६-१२-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यात नाबार्डने पाणलोट क्षेत्र विकासासाठी ६ गावांची निवड करुन ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रकल्प ४ वर्षात पूर्ण करायचा असून प्रत्येक गावात सरासरी ५० लाख रुपये खर्च करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या प्रकल्पात स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३१-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
नाबार्डमार्फत साक्री तालुक्यात ६ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.
(३) नाबार्डमार्फत स्थानिक लोकप्रतिनिधींना प्रकल्पाची माहिती व त्यांना सहभागी करून घेणेबाबत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) मधील ग्रामीण रुग्णालयातील शव विच्छेदनगृहात आवश्यक साहित्य उपलब्ध नसल्याबाबत**

**(२९) ९८९३६ (२७-१२-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण ग्रामीण रुग्णालयातील शव विच्छेदनगृहात शव विच्छेदनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृतांच्या नातेवाईकांनाच शवविच्छेदन करण्यासाठी लागणारे सर्व साहित्य बाजारातून आणावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयातील शवविच्छेदन गृहात शवविच्छेदनासाठी आवश्यक असलेली सर्व साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही,
(३) शवविच्छेदनासाठी आवश्यक असणारे हत्यारांचा संच, दोरा व बाटल्या इत्यादी साहित्य रुग्णालयामध्ये उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयातील काही मशिनरी बंद तसेच औषधांचा तुटवडा निर्माण होत असल्याबाबत**

**(३०) ९८९६१ (०३-०१-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयातील काही मशिनरी बंद तसेच औषधांचा तुटवडा निर्माण होत असल्याने रुग्णांना आर्थिक भार सहन करावा लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आवश्यक मशिनरी व औषधांचा पुरेसा पुरवठा उपलब्ध होण्याबाबत रुग्णालय प्रशासनाने जिल्हा आरोग्य विभागाकडे पाठ पुरावा केला आहे काय,
(३) असल्यास, त्या अनुषंगाने मशिनरी व औषधांचा पुरेसा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा सद्यस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०६-२०१८) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

रुग्णवाहिका, क्ष-किरण यंत्र, मल्टिपॅरा मॉनिटर, फिटल मॉनिटर ही यंत्रसामुग्री नादुरुस्त होती. तथापि, रुग्णवाहिका दुरुस्त झाली असून, मल्टिपॅरा मॉनिटर व फिटल मॉनिटरचा पुरवठा जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग येथून करण्यात आलेला आहे. क्ष-किरण यंत्र दुरुस्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. कुडाळ तालुक्यामध्ये अचानक वाढलेल्या तपासरीच्या रुग्णांमुळे काही औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता. तथापि, त्याकरिता जिल्हा रुग्णालय, सिंधुदुर्ग येथून औषधांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(३) ग्रामीण रुग्णालय, कुडाळ येथे आवश्यक ती यंत्रसामुग्री व आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संजय गांधी नगर (जि. अमरावती) नगरवासियांना कायमस्वरूपी जमिनीचे मूळ मालकी पट्टा त्यांना देण्याबाबत**

**(३१) १०१८७६ (१२-०१-२०१८). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी नगर (जि.अमरावती) येथील वनविभागाच्या जमिनीवर कायमस्वरूपी जमिनीचे मूळ मालकी पट्टा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, महानगर पालिका, अमरावती आयुक्त, यांच्या समन्वयातून शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे यासाठी संबंधित लोकप्रतिनिधी यांनी शासन स्तरावर वारंवार पाठपुरावा करुनही वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संजय गांधी नगर वासियांना नोटीस पाठविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन या बाबत संजय गांधी नगर वासियांना न्याय देण्यासाठी महसूल विभागामार्फत जमीन मंजूर करून व ती जमीन वनविभागाला हस्तांतरित करून कायम स्वरूपी मूळ मालकी हक्क मिळवून देणार आहे काय,
(३) असल्यास शासनाने या बाबत कोणता निर्णय घेतला व घेणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०६-२०१८) :** (१), (२) व (३) वडाळी, ता.जि.अमरावती येथील स. नं. ८४ मधील ५.२६ हे. राखीव वनजमीन एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार योजनेकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. तथापि, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील मार्गदर्शक सूचना विचारात

घेऊन राज्य शासनाने प्रस्तावास शिफारस केलेली नाही. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावरून अतिक्रमण धारकांना नोटीस देण्यात आल्या आहेत. सदर जमिनीवरील अतिक्रमणाचा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने शासनस्तरावरून दि.०७.०२.२०१८ रोजी केंद्र शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दि.२०.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत तरतूदी तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, आयुक्त,अमरावती महानगरपालिका व मुख्य वनसंरक्षक (प्रा.), अमरावती यांना दि.०४.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील तरतूदी तपासून आवश्यक प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

---

**राज्यात रक्तदान करण्यासाठी आलेल्या प्रत्येक रक्तदात्याची वैद्यकीय माहिती न घेता रक्तदान करण्यात येत असल्याबाबत**

**(३२) १०३५०९ (०६-०१-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रक्तदान करण्यासाठी आलेल्या प्रत्येक रक्तदात्याचा वैद्यकीय माहिती व त्यांच्या आजाराबाबची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक असतानाही कोणतीही माहिती न घेता रक्तदान करण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, रक्तदान करणा-या प्रत्येक रक्तदात्याची वैद्यकीय तपासणी करुनच रक्तदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

रक्तदान करण्यासाठी आलेल्या प्रत्येक रक्तदात्याची रक्त घेताना Transfusion Medicine Technical Manual मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संपूर्ण वैद्यकीय माहिती घेऊन व आवश्यक त्या तपासण्या झाल्यानंतरच रक्तदात्याची निवड करण्यात येते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) तालुक्यातील वनक्षेत्रात वनतळे व जलसंधारणाची कामे करण्याबाबत**

**(३३) १०५२२८ (३१-०३-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील वन्यजीवांसाठी आहेरवाडी, जायदरे, सोमठाणजोश, भारम, कोळम इत्यादी ठिकाणी वनतळे व जल व मृद्संधारणाची कामे करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जुलै २०१७ रोजी वा त्या सुमारास उपवनसंरक्षक, नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने येवला तालुक्यातील वनक्षेत्रात वनतळे, सिमेंट बंधारे, सीसीटी इ.जलसंधारणाची कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१८) :** (१) होय.

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जुलै महिन्यात उप वनसंरक्षक, पूर्व भाग नाशिक यांच्याकडे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

(२) विविध योजनेअंतर्गत सन २०१६-१७ पर्यंत प्राप्त झालेल्या निधीतून येवला तालुक्यातील आहेरवाडी-२ वनतळे, जायदरे-१० वनतळे, सोमठाणजोश-२३ वनतळे, १ डिपसीसीटी, ५ सिमेंट नालाबांध, ७० लहान मातीबांध, कोळम येथे १० वनतळे अशी एकुण-१२१ जल व मृद संधारणाची कामे करण्यात आलेली आहे. भारम येथे जल व मृद संधारणाची कामे करण्यास वाव नसल्याने कामे घेण्यात आलेली नाही.

सन २०१७-१८ मध्ये जलयुक्त शिवार अभियानातील समाविष्ट येवला तालुक्यातील एकुण ६ गावात जल व मृद संधारणाची १० कामे प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळील झोपडपट्यांच्या पुर्नवसनाबाबत

**(३४) १०५२४६ (०७-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळील झोपडपट्यांचे पुर्नवसन करण्याचे आदेश न्यायालयाने शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नॅशनल पार्कजवळील सन १९९५ पूर्वीच्या झोपडपट्टीधारकांनी शासनाकडे ७ हजार रुपये शुल्क भरले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाच्या आदेशानुसार १८ वर्षे उलटल्यानंतरही १८ हजार पडपट्टीवासीयांचे पुर्नवसन न करण्याची कारणे काय आहेत वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन जमिनी वरील पात्र अतिक्रमकांची संख्या २५१४४ इतकी आहे. पहिल्या टप्प्यात प्रत्येकी ७ हजार रुपये रककम भरलेल्या ११३५९ अतिक्रमकांचे मौजे चांदिवली येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मे. सुमेर कॉर्पोरेशन, विकासक यांनी संघर्षनगर, चांदिवली येथे बांधलेल्या इमारतीमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे.

दुस-या टप्प्यातील १३४८६ अतिक्रमकांच्या पुनर्वसनाकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मे.डी.बी.रिअॅल्टी या विकासकाची चांदिवली स्थित संघर्षनगर परिसरात सदनिका तयार करणेकामी नेमणूक केली आहे. तथापि सदर बांधकाम मुंबई विमानतळाचे Air Funnel मध्ये येत असल्याने बांधकाम बंद करण्यात आले आहे. पुनर्वसनाकरीता पर्यायी जागा निश्चित करण्याकीरता व पुनर्वसनाची प्रक्रिया शिघ्र गतीने पुर्ण करण्याकरीता मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सशक्तता समिति स्थापित करण्यात आली आहे.

---

### देवदरी, खरवंडी व देशमाने (ता.येवला, जि.नाशिक) येथील अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये जलसंधारणाची कामे सुरु करण्याबाबत

**(३५) १०५७३९ (०४-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवदरी, खरवंडी व देशमाने (ता.येवला, जि.नाशिक) येथील अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये जलसंधारणाची कामे सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लघुसिंचन विभाग नाशिक यांचेकडे पत्राद्वारे मागणी केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (०७-०६-२०१८) :** (१) होय.

(२) सदर तीनही योजनांचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आलेले असून या योजना प्रचलित आर्थिक मापदंडात बसत नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाड (जि.रायगड) तालुक्यातील किंजळोली पाझर तलावासाठी जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न दिल्याबाबत

**(३६) १०६०५९ (०७-०४-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) पाणी टंचाई बरोबरच शेती ओलीताखाली यावी यासाठी पाटबंधारे विभागाने सन १९८० मध्ये किंजळोली येथे २४५ मीटर लांब आणि १९.८० मीटर उंच असलेल्या मातीच्या पाझर तलावाला १८.३ हेक्टर खासगी जमीन संपादित करुन ३७ वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही बाधित शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर तलावाचे काम ३७ वर्ष उलटून गेले तरी अद्याप पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई किती कालावधीत देण्यात येणार आहे ?

**प्रा. राम शिंदे (२७-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही, सदर योजना सन २००७-०८ मध्ये जिल्हापरिषद रायगड यांचेकडून जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जिल्हा-ठाणे यांचेकडे हस्तांतरित झालेली आहे. योजनेचा १८.३६ हेक्टर क्षेत्राचा भुसंपादन प्रस्ताव सन २०१० मध्ये मा.जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे सादर करण्यात आला होता. कलम-६ ची कार्यवाही चालु असतांना नविन भूसंपादन कायदा-२०१३ अस्तित्वात आला. त्यानुसार पुनश्च १५.४० हेक्टर क्षेत्राचा भुसंपादन प्रस्ताव नव्याने दि.२/४/२०१७ अन्वये मा.जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांना सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे उल्लेखित १८.३० हेक्टर खाजगी क्षेत्र अद्यापपर्यंत संपादित झालेली नाही.

(३) सदर योजनेसाठी आवश्यक खाजगी जमिनीचे भुसंपादन नविन कायद्यानुसार मा.जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे मार्फत अंतिम निवड जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचेकडुन निधी प्राप्त करुन घेऊन भुसंपादन मोबदला बाधित शेतकऱ्यांना देण्यात येईल.

---

**धारणी (जि. अमरावती) वन जमिनीवरील अतिक्रमित आदिवासी कब्जेदार यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(३७) १०६५२५ (३१-०३-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) वन जमिनीवरील अतिक्रमित आदिवासी कब्जेदार यांच्या प्रलंबित मागण्यांकरिता एका पक्षाच्या वतीने दिनांक २० फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे भूमिपुत्र जन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या आंदोलकाकडून करण्यात आलेल्या मागण्या काय आहेत याची शासनाने माहिती घेतली आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) धारणी, जि.अमरावती वन जमिनीवरील अतिक्रमित आदिवासी कब्जेदार यांच्या प्रलंबित मागण्यांकरिता दिनांक २०.०२.२०१८ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे भूमिपुत्र जन अंदोलन करण्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्ष तालुका शाखा धारणी यांच्या वतीने दिनांक ५.०१.२०१८ रोजीच्या निवेदनान्वये उप विभागीय अधिकारी, धारणी यांना देण्यात आला होता.

(२) सदर निवेदनामध्ये आंदोलकांकडून २१ वेगवेगळ्या मागण्या करण्यात आल्या होत्या. त्यापैकी "धारणी व चिखलदरा वन विभागातील केंद्र सरकारच्या २००५ च्या कायद्यानुसार वन जमिनीवर ज्यांनी २००५ पूर्वी अतिक्रमण केले अशा आदिवासींना वनपट्टा देण्यात यावा व २०१६-१७ मध्ये फॉरेस्ट कर्मचाऱ्यांनी पिक कापले त्याचे नुकसान देण्यात यावे." अशी मागणी वन विभागाशी संबंधित होती.

(३) धारणी व चिखलदरा वन विभागातील अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित २०१२ अंतर्गत धारणी व चिखलदरा तालुक्यातील वैयक्तिक व सामुदायिक वन हक्काच्या प्राप्त दाव्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| तालुका | प्राप्त दावे | | मंजूर दावे | | उपविभागीय स्तरीय समितीकडे प्रलंबित असलेले दावे | | उपविभागीय स्तरीय समितीकडून अपात्र ठरविण्यात आलेले दावे | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सामुदायिक | वैयक्तिक | सामुदायिक | वैयक्तिक | सामुदायिक | वैयक्तिक | सामुदायिक | वैयक्तिक | |
| धारणी | १२ | १२८ | १२ | ११३ | ० | ० | ० | १५ | - |
| चिखलदरा | ५२२ | ४६ | २३९ | ३५ | २११ | ०८ | ७२ | ०२ | ४६ दाव्यांपैकी १ दावा वपअ यांचे स्तरावर पडताळणी करीता प्रलंबित आहे. |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील वनविभागाच्या अमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(३८) १०६७१८ (०७-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वन विभागाच्या जमिनीवरील अतिक्रमण काढण्याचे काम जैसे थे स्थितीत असल्याचे माहे डिसेंबर २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील डोंगरगाव, बुरकेगाव व फुलगाव भावडी डूडूळगावात वन विभागाच्या जागा बळकावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत एनजीटीने ३ वेळा वन विभागाला आदेश देवूनही अतिक्रमणाबाबत वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दाखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पुणे जिल्ह्यातील वन विभागाच्या जमिनीवर असलेल्या सुमारे ४५७.३५८९३ हे.आर अतिक्रमीत क्षेत्रापैकी सन २०१७-१८ मध्ये गृह विभाग व महसूल विभागाच्या मदतीने वन विभागाने सुमारे २३०.५९ हे.आर क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित केले आहे.

(२), (३) व (४) पुणे जिल्ह्यातील डोंगरगाव, बुरकेगाव व फुलगाव, भावडी व डूडूळगाव या गावापैकी डोंगरगाव, फुलगाव व भावडी येथील अतिक्रमणे हटविण्यात आले असून त्याबाबचा अहवाल मा.राष्ट्रीय हरीत लवादास कारवाई करुन सादर केला आहे. उर्वरित मौ. बुरकेगाव येथील मे.प्रिकास्ट इ.लि. कंपनीने वनक्षेत्रावर केलेल्या अतिक्रमणाबाबत मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत त्यामुळे सदर अतिक्रमण निष्कासित करण्याची कारवाई प्रलंबित ठेवली आहे. तसेच मौजे डुडुळगाव येथे जुने अतिक्रमण असून याबाबतची वस्तुस्थिती मा.राष्ट्रीय हरित लवादाला अवगत करण्यात आली आहे. लवादाच्या आदेशावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात वृक्ष संवर्धनाचे कामात झालेली अनियमितता

**(३९) १०६७८९ (३१-०३-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात माहे जुलै, २०१७ मध्ये लावलेल्या वृक्ष संवर्धनाचे कामात अनियमितता आढळून आल्यामुळे कोल्हापूर वन विभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना निलंबित केल्याची बाब माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वृक्षलागवडीच्या कामांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी मध्ये काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१८) :** (१) होय.

(२) अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (मुख्यालय) सामाजिक वनीकरण, पुणे यांनी दि.२८ व दि.२९ डिसेंबर, २०१७ रोजी तक्रारीमध्ये नमूद रोपवन कामांना भेटी देऊन वस्तूस्थितीची पाहणी केली आहे.

(३) व (४) प्राथमिक चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधीत वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ अंतर्गत शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

**देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथे अवैधरित्या कटसाईज लाकडांची झालेली वाहतूक**

**(४०) १०६९०२ (३१-०३-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव राजा (जि. बुलढाणा) येथे अवैधरित्या कटसाईज लाकडांची वाहतूक करणाऱ्या वाहनांस दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वन विभागाने पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी आतापर्यत किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) बुलढाणा वनविभागातील देऊळगाव राजा वन परिक्षेत्रामधील वनरक्षक हे गस्त करीत असताना देऊळगाव राजा ते चिखली मार्गावर सिनगांव फाटयाजवळ वाहन पिकअप ४०७/एमएच-२१ एक्स १६६७ या वाहनामध्ये काटशेवर प्रजातीच्या कटसाईज माल नग ९० घन फुट १.००७ एवढा माल विना परवाना वाहतुक करताना आढळून आला. त्यामुळे विना परवाना वाहतुक केल्याप्रकरणी वनगुन्हा दिनांक २९.१२.२०१७ अन्वये नोंदविण्यात आला. सदरचे वाहन व माल जप्त करुन वनविभागाच्या ताब्यात घेण्यात आला.

(२) काटशेवर प्रजातीचे झाड खाजगी क्षेत्रातील असल्यामुळे प्रकरणी कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. वनपाल देऊळगाव राजा यांनी चौकशी करुन गाडी मालक श्री. आण्णा कोरडे व वाहनचालक श्री.संतोष चोखाजी जाधव रा.सिंदखेड राजा यांचेवर भारतीय वनअधिनियम, १९२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) विना परवाना वाहतुक केल्याप्रकरणी प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिके व कॅम्पा) बुलढाणा यांचे दिनांक १०.१.२०१८ चे आदेशान्वये गाडी मालक श्री.आण्णा कोरडे, रा.सिंदखेड राजा यांना रु.५,०००/- नुकसान भरपाई करुन प्रकरण अभिसंधान करण्यात आले आहे.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पेठ वडगांव मु.पो.सोनार्ली वसाहत यांना अभयारण्याकडून मिळणाऱ्या नागरी सुविधांचा लाभ मिळणेबाबत.**

**(४१) १०७०१५ (३१-०३-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पेठ वडगांव येथे स्थलांतरण होवून वास्तव्यास असलेल्या सोनार्ली वसाहत वाल्यांचे मुळ गाव हे चांदोली अभयारण्य बाधित असल्याने सदर बाधित ग्रामस्थांना अभयारण्याकडून मिळणाऱ्या नागरीसुविधांचा लाभ मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या नागरी सुविधांचा लाभ घेण्यास पात्र असून देखील लाभ न मिळल्याने या ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता वारणा कालवे विभाग, इस्लामपूर यांना निवेदन देवून मागण्या सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार ग्रामस्थांना अभयारण्याकडून मिळणाऱ्या नागरी सुविधांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
सोनार्ली पुनर्वसन वसाहतीमध्ये वारणा प्रकल्प व चांदोली अभयारण्य प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आले असून, या वसाहतीमध्ये १८ नागरी सुविधा देय आहेत. त्यापैकी जलसंपदा विभागाकडून देय असलेल्या १० नागरी सुविधापैकी ९ मुलभूत सुविधा पुरविल्या आहेत. उर्वरित नागरी सुविधा पूर्ततेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे आहे.
(३) निवेदनानुसार आवश्यक कामांची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात भिमा नदीच्या कडेला वाळू उपसा होत असल्याबाबत

**(४२) १०७२४१ (३१-०३-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा तालुक्यात (जि.अहमदनगर) मोठया प्रमाणात वाळू चोरी होऊनही भीमाकाठच्या गावाचा नकाशात वन विभागाकडे नदीकाठच्या गावाचा नकाशा नसल्याने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कारवाईसाठी गेलेला वनविभागाचा ताफा कारवाई विना परतल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) : (**१), (२) व (३) श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) भीमा काठच्या गावाचा नकाशा वन विभागाकडे उपलब्ध आहे.
मौजे गार फॉ.स.नं. १३६ व मौजे कौठा फॉ.स.नं. २९ मध्ये अनुक्रमे दिनांक ९.८.२०१७ व दिनांक ३.२.२०१८ भीमा नदीच्या कडेला वाळू उपसा करणारी बोट निदर्शनास आली तथापि, त्यांना पकडण्यापूर्वी त्यांनी पळ काढल्यामुळे अज्ञात व्यक्तींविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.
मौजे गार फॉ.स.नं. १३६ मध्ये पुन्हा एकदा दिनांक २५.४.२०१८ रोजी भीमा नदीच्या कडेला वाळू उपसा करणाऱ्या तीन बोटी निदर्शनास आल्या सदर बोटीसह पकडलेले तीनही

आरोपी विरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१)(अ)(ह) अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

परंतू माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कोणत्याही प्रकारची वाळू तस्करी/वाळू उपसा करताना वाहन अथवा बोट आढळून आलेले नसल्यामुळे कारवाईसाठी गेलेला वन विभागाचा ताफा कारवाई विना परतलेला होता.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मुंगशी (ता.माढा,जि.सोलापूर) गावातील सिना नदीवर सिमेंट बंधारा बांधण्याबाबत**

**(४३) १०७४५६ (२८-०३-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुंगशी (ता.माढा, जि.सोलापूर) गावातील पाणी पुरवठा योजना मार्च ते जून या कालावधीमध्ये पाण्याअभावी बंद रहाते यासाठी सिना नदीवर सिमेंट बंधारा बांधावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सिना नदीवर को.प.बंधारा कामाचे सर्वेक्षण करून त्यानूसार प्रस्ताव तयार करण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील साठवण तलावासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यतेचा प्रस्तावाबाबत**

**(४४) १०७६७० (०४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील साठवण तलावाची साठवण क्षमता १.५० एमएम ३ पेक्षा जास्त असल्याने या प्रकल्पात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरण एमडब्ल्युआरआरअे यांची मान्यता घेण्याबाबत मुख्य अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) पुणे यांना दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मान्यता देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०६-२०१८) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे वैरागड साठवण तलाव (ता.चिखली, जि.बुलढाणा) योजनेस महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (एम.डब्ल्यु.आर.आर.ए.) यांची मान्यता प्राप्त करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतावर वन्यप्राण्यांचा हल्ल्याने होणारे नुकसान**

**(४५) १०८२५३ (३१-०३-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांच्या शेतात वन्य प्राणी घुसून शेती पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान करीत असल्याबाबत शेतक-यांनी संबधीताकडे वारंवार निवेदन देण्यात येवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील शेतकरी वन्यप्राण्याचा कायमचा बंदोबस्त व्हावा याकरीता वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे मागणी केली असता वनविभागाचे अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील शेतकऱ्यांनी वन विभागाकडे सौर ऊर्जेचे कुंपण उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागातील शेतकऱ्यांचे वन्यप्राण्यांपासुन होणारे नुकसान टाळण्याकरीता सौर ऊर्जेचे कुंपण व झालेले नुकसानीची भरपाई वनविभागाकडुन देण्यात आलेली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सन २०१७-१८ मध्ये बुलढाणा वन विभागात वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान झाल्यासंबंधी ७२३६ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितांना रु. ३,९२,६२,९७३/- अर्थसहाय अदा करण्यात आले आहे.

शेतक-यांनी सौरउर्जेचे कुंपन उपलब्ध करून देण्याची मागणी केलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाटण सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये येणा-या गांवाचे पुनर्वसन करणेकरीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत

**(४६) १०८७८४ (३१-०३-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण येथील सह्याद्रीच्या डोंगरपठारावर वसलेली मळे, कोळणे, पाथरपुंज ही तीन गांवे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये येणा-या या तीन गांवाचे तात्काळ पुनर्वसन करण्याचा आराखडा सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामार्फत तयार करण्यात आला असून या तीन गावांच्या पुनर्वसनाकरीता जागा शोधण्याचे कार्य प्रकल्पाकडून तसेच या प्रकल्पग्रस्तांकडून सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मळे येथील १४०, कोळणे येथील ७९ आणि पाथरपुंज येथील १०६ कुटुंबे यांची एकूण लोकसंख्या ही सुमारे २३५८ असून येथील लोक, महिला तसेच लहान मुले यांच्यात सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन विभागाकडून या प्रकल्पग्रस्तांना दाखविण्यात आलेल्या जमिनी या तेथील स्थानिक लोक या प्रकल्पग्रस्तांना देण्यास तयार नसल्याने मळे, कोळणे, पाथरपुंज येथील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरीता पाटण तालुक्यातच जागा उपलब्ध करुन दयावी अशी मागणी या प्रकल्पग्रस्तांची आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच या तीन गावातील प्रकल्पग्रस्तांना पाटण तालुक्यातच पुनर्वसनाकरीता जागा उपलब्ध करुन देणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मळे, कोळणे, पाथरपुंज गावातील प्रकल्पग्रस्तांना सातारा जिल्हयातील वन जमिन दाखविण्यात आली असुन त्यांनी सातारा वन विभागातील मौजे बहुले, सोनाईचीवाडी, मारूलहवेली, मल्हारपेठ, बोंद्री ता.पाटण व मौजे हेळगाव, खराडे ता.कराड येथील वनजमीन त्यांचे पुनर्वसनासाठी पसंत केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मौजे मळे व कोळणे या गावातील प्रकल्पग्रस्तांनी पाटण व कराड तालुक्यातील वन जमीन त्यांचे पुनर्वसनासाठी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केलेली आहे. त्यानुसार मौजे बहुले, मल्हारपेठ, ता.पाटण या गावातील व मौजे खराडे, ता. कराड येथील ग्रामसभेने प्रकल्पग्रस्तांना वनजमिनी देणेबाबत सकारात्मक ठराव दिलेले आहेत.

(५) मौजे मळे, कोळणे व पाथरपुंज ता. पाटण येथील प्रकल्पग्रस्तांनी मौजे बहुले, बोंद्री अंतर्गत जाईचीवाडी, सोनाईचीवाडी, मारूलहवेली, मल्हारपेठ, बोंद्री, ता.पाटण व मौजे हेळगाव,

खराडे ता.कराड येथील वनजमीन त्यांचे पुनर्वसनासाठी पसंत केली आहे. यापैकी सकारात्मक ग्रामसभा ठराव असलेल्या गावातील वनक्षेत्राची मोजणी करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच, काही गावांच्या ग्रामसभेने नकारात्मक ग्रामसभा ठराव दिले असल्याने, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी सातारा जिल्हयातील इतर ठिकाणच्या वन जमिनी दाखविण्याची कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर तालुका (जि.नांदेड) येथे अवर्षणप्रवणामुळे**
**पाणी टंचाईची समस्या सोडविण्याबाबत**

**(४७) १०९१७३ (०४-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर तालुका (जि.नांदेड) कायम अवर्षणप्रवण असून येथील अनेक गावांत माहे जानेवारी महिन्यापासूनच पाणी टंचाईमुळे नागरिकांना पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर गावात शेतीचे सिंचनही अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने येथील पाणी समस्येची कायमची सोडवणूक करण्याबाबत स्वंयसेवी संस्थाच्या मदतीने जलसंधारणाची लोकचळवळ उभी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. माहे जानेवारी ते मार्च, २०१८ मध्ये टँकरसाठी केवळ एक प्रस्ताव प्राप्त झाला असून मौजे समंदरवाडी येथे दि.३/३/२०१८ पासून टँकरद्वारे पाणी सुरू करण्यात आले आहे.

(३) सत्यमेव जयते वॉटरकप स्पर्धेअंतर्गत जलसंधारणाची चळवळ उभी राहीली असून या चळवळीस प्रोत्साहन देण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.०३/४/२०१८ अन्वये सन २०१८-१९ पाणी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धेत जी गावे सहभागी होऊन मृद व जलसंधारणाची कामे श्रमदानाद्वारे करतील अशा गावांना प्रोत्साहन म्हणून मशिनद्वारे करण्यात येणाऱ्या कामाकरीता इंधनाच्या खर्चासाठी प्रति गाव रू.१.५० लक्ष निधी जलयुक्त शिवार अभियान सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीतून देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील हिवरी वनपरिक्षेत्रांतर्गत वृक्षांची मोठ्या प्रमाणात तोड केल्याबाबत**

**(४८) १०९३४२ (३१-०३-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील हिवरी वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या कोळंबी शिवारातील राहूलधरी शिव परिसरातील राखीव वनातील सागवान व आडजात वृक्षांची मोठया प्रमाणात तोड करण्यात येऊनही वनअधिकारी यांचे दुर्लक्ष करीत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साग व आडजात वृक्षांची होत असलेली तोड थांबविण्याबाबत अवैध वृक्ष तोडीकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०६-२०१८) : (**१) यवतमाळ जिल्हयातील हिवरी वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या कोळंबी शिवारातील राहूलधरी शिव परिसरातील राखीव वनातील सागवान व आडजात वृक्षांची मोठया प्रमाणात तोड करण्यात येऊनही वनअधिकारी यांचे दुर्लक्ष करीत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आंबोली वन विभागाकडून आंबोलीत राहत असलेल्या ग्रामस्थांच्या घरांच्या व रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(४९) १०९८६४ (३१-०३-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आंबोली वन विभागाकडून आंबोलीत शेकडो वर्षापासून राहत असलेल्या ग्रामस्थांच्या घरांच्या व रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी परवानगी देत नसल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधींनी वन विभागाकडे वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबोली गावाचे क्षेत्र १९६५ नंतर वन घोषित झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १९६५ पूर्वीच्या घरांच्या दुरुस्तीसाठी व पुनर्बांधणीसाठी तसेच रस्त्याच्या डांबरीकरण व खडीकरण कामासाठी तसेच ब्रिटीशकालीन जलवाहिन्यांच्या नुतनीकरणासाठीचे काम करण्यास जीवन प्राधिकरण विभागास वन विभागाने मनाई करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) मौजे आंबोली येथे २११५.९९ हे.आर वनक्षेत्र आहे. या व्यतिरिक्त २२३५.१५ हे.आर क्षेत्र महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ अन्वये संपादित असल्यामुळे सदर क्षेत्रावर केंद्र शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय वनेत्तर कामास बंदी आहे. सदर बाब स्थानिक जनतेस वन विभागाकडून वारंवार पटवून देण्यात आली आहे. तरी देखील ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींन मार्फत वारंवार निवेदने प्राप्त होत आहेत.
(२) आंबोली गावाचे क्षेत्र शासन राजपत्र दिनांक ५.१.१९६० व दिनांक १२.२.१९६६ अन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम - ४ अंतर्गत राखीव वने म्हणून अधिसूचित झाले आहे.
(३) ब्रिटीश कालीन जलवाहिन्यांच्या नुतनीकरणासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक जंगल निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत नियम ३ (२) नुसार वनेत्तर कामासाठी वनक्षेत्राचा वापर करण्यास जीवन प्राधिकरण विभागास वन विभागाकडून दिनांक ४.१२.२०१७ अन्वये परवानगी देण्यात आली आहे.

---

### सिंधुदुर्ग जिल्हयातील तालुकानिहाय गावातील जलयुक्त शिवार योजनेबाबत

**(५०) १०९९३३ (०४-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील तालुकानिहाय गावे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत पहिल्या व नंतरच्या टप्प्यात निवडण्यात आली असल्यास जलयुक्त शिवार योजनेमुळे जिल्हयातील किती हेक्टर जमिन ओलीताखाली आणि सिंचनाखाली येणार आहे,
(२) असल्यास, किती गावातील जलयुक्त शिवाराची कामे पूर्ण झाली आहेत व ही कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(३) अद्याप योजना पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) जलयुक्त शिवार योजनेमुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील २०७०.५४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.
(२) जलयुक्त शिवार योजनेची ५८ गावांत कामे पूर्ण झाली असून त्यासाठी रू.३९.०८ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे त्यापैकी रू.२६.७१ कोटी निधी खर्च करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.